



# पारनेर दर्शन







वर्ष ३ अंक ४०, रविवार २९ डिसेंबर २०२४ | ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये


# विचारांची बांधिलकी असणारांना सोबत घेणार!

## ■ आमदार काशिनाथ दाते यांची कार्यकर्त्यांना साद ■ राष्ट्रवादी काँग्रेसच्या मेळाव्यात दाते यांनी साधला संवाद ■ महायुती व राष्ट्रवादीच्या एकत्रित ताकदीमुळे विजय

पारनेर : विशेष प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फुट पडल्यानंतर आपल्या पक्षाचे फक्त तीन पदाधिकारी तालुक्यात होते. गावागावांत संघटन नव्हते. महायुती तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रित ताकदीमुळे विधानसभा निवडणूकीत आपण विजय संपादन केला. आता पक्षसंघटना वाढविण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर असून आमच्या विचारांशी बांधिलकी असलेल्या कार्यकर्त्यांनी आमच्यासोबत यावे अशी साद आमदार काशिनाथ दाते यांनी घातली.**

राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात आ. दाते हे बोलत होते. जिल्हाध्यक्ष अशोक सावंत हे मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी सुजित झावरे पाटील, प्रशांत गायकवाड, गणेश शेळके, विक्रमसिंह कळमकर, भास्कर उचाळे, सुषमा रावडे, सुधामती कवाद, नितीन शेळके यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना आ. दाते म्हणाले, विविध पक्षाला मानणारे कार्यकर्ते आपल्यासोबत आहेत. व्यक्तिच्या विचारधारेवर पक्षाची विचारधारा माणणारे अनेक कार्यकर्ते आहेत. जुने जाणते कार्यकर्ते आहेत. त्यांना सर्वांना सामावून घ्यायचे आहे. अजित पवार यांचया पाठशी ताकद उभी करायची असल्याची साद त्यांनी घातली.

दाते पुढे म्हणाले, पाच वर्षात तरूणांचा भ्रमनिरास झाला, त्यामुळे तरूणही आपल्याकडे आकर्षित झाला. त्यातूनच सत्ता परीवर्तन झाले. उमेदवारीची पात्रता सर्वांकडे होती. परीवर्तन करायचे असेल तर मी थांबण्याचा सल्ला त्यांना दिला. सर्वांनी ऐकले आणि परीतर्वन झाले ते टिकविण्याची जबाबदारी तुम्हा सर्वांवर असल्याचे दाते यांनी स्पष्ट केले.

त्यांची सत्ता ३० वर्षे राहणार असे सांगत अनेक जण सोडून गेले. तसे झाले असते तर मतदारसंघाची दयनीय अवस्था झाली असती. आपण धाडस केले. ४० हजार मतांचे लिड पार करून ही निवडणूक जिंकायची होती. अजित पवार यांनी विश्वास टाकला होता. सर्वांचे सर्वे क्षण चांगले होते. सगळे एकत्र असतील तर निकाल सकारात्मक होणार असल्याने त्यांनी सर्वांना एकत्र आणले. सर्वाची समजुत काढली. कार्यकर्त्यांनी, मतदारांनी विश्वास टाकला म्हणून हे सगळे घडल्याचे दाते यावेळी बोलताना म्हणाले.



■ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बैठकीत आमदार काशिनाथ दाते यांनी मार्गदर्शन केले.

### कार्यकर्ता पातळीवर अभ्यासपुर्ण काम हवे

आपल्याला आगळं वेगळं काम करायचे आहे. स्व. वसंतरावदादांच्या काळात पाणी आडविण्याचे, जलसंधारणाचे काम झाले. त्यानंतर पाण्यासंबंधी काम झाले नाही हे दुर्देवी आहे. या प्रश्नाला तुमच्या सहकार्याने न्याय द्यायचा आहे. अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना कामाची पध्दत समजावणार आहे. आम सभेचे आयोजन करून सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याच्या सुचना देऊ. तालुक्यात ७० ते ९० कोटी रूपयांच्या योजना जल जीवन योजनेच्या माध्यमातून करण्यात आल्या, मात्र हा निधी वाया जातो की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. पाण्यासाठी विविध योजना राबविल्या गेल्या, गावागावांमध्ये कोटी दोन कोटी रूपये मिळाले मात्र एकाही गावाला पाणी मिळाले नाही. कार्यकर्ता पातळीवर अभ्यासपुर्ण काम झाले तरच योजना यशस्वी होणार आहेत. त्यासाठी हवे ते सहकार्य देण्याची माझी तयारी आहे.

आमदार काशिनाथ दाते
विधानसभा सदस्य

### तुमचे लेटरपॅड मला देऊ नका !

त्यावेळी दादांचा दाते सरांवर विश्वास होता. दादांचे कोरे लेटरपॅड त्यांच्याकडे असायचे अशी आठवण करून देत मला तुमचे लेटरपॅड नका देऊ कारण तुमच्या मनात माझी वेगळी प्रतिमा असल्याचे सांगत सुजित झावरे यांनी पुन्हा मिश्किली केली. तोच धागा पकडत आ. दाते यांनी सुजित पाटील तुम्ही चिंता करू नका. माझा स्वभाव तुम्हाला माहीती आहे. जि.प. मध्ये काम करताना मी सर्व कार्यकर्त्यांना विचारून काम दिले. कोणत्या पक्षाचा आहे ते पाहिले नाही. सगळया कार्यकर्त्यांना विचारात घेऊन काम केले. विचारून काम केले नाही, त्यांना ताकद दिली नाही तर त्यांच्या पाठीशी लोक कसे उभे राहतील ? असा सवाल आ. दाते यांनी केला.

### ते बाथरूममध्येही दादांना गाठू शकतात !

आपल्या पक्षाकडे दोन माणसे भक्कम आहेत. ते बाथरूममध्येही अजितदादांना गाठू शकतात. दाते सर तुमच्याकडून काम झाले नाही तर ते हे दोघे ते काम करून आणतील असे सांगत सुजित झावरे यांनी प्रशांत गायकवाड व अशोक सावंत यांनाही चिमटा घेतला.

### दाते यांना साथ द्या

आगामी काळात काशिनाथ दाते यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकांची मोर्चेबांधणी करायची आहे. सर्वांनी मतभेद विसरून तालुक्याचे नेतृत्व म्हणून दाते यांना आपण स्विकारले असून त्यांना सर्वांनी साथ द्यावी.

वसंत मोरे

### बाहेरच्या ठेकेदारांना कामे नाहीत !

विविध कामे करण्यासाठी बाहेरचे ठेकेदार आणणार नाही. नातलगही आणणार नाही. सक्षम कार्यकर्त्यांना कामे देण्याची भुमिका घेऊ. कोणत्याही बाबतीत अडचण येणार नाही नसल्याची ग्वाही आ. दाते यांनी यावेळी दिली.

### गाडेकर किसान सेलचे तालुकाध्यक्ष

यावेळी राष्ट्रवादी किसान सेलच्या तालुकाध्यक्षपदी इंद्रभान गाडेकर यांची नियुक्ती करण्यात आली. निवडीनंतर ते म्हणाले, वसंतराव झावरे यांच्यापासून आपण घडयाळासोबत काम करत आहोत. आम्हाला कोणत्याही पदाची अपेक्षा नाही. आपण सर्वजण एकत्र आलो आहोत, त्याच विचाराने तालुक्याचा कारभार करावा. तुमच्यात गडबड झाली तर आम्हाला दु:ख होईल. स्व. वसंतरावदादांच्या काळाप्रमाणे तालुक्यात पुन्हा काळ आला असल्याचे गाडेकर म्हणाले.

### म्हणून मी थांबण्याचा निर्णय घेतला

१९९९ पक्षाची स्थापना झाली त्यावेळी स्व. वसंतराव झावरे यांनी प्रवेश केला. दाते सरही त्यावेळी दादांसोबत होते. दोघांनी राष्ट्रवादी पक्ष वाडया वस्त्यांपर्यंत पोहचविला. पुढे मतभेद झाले मात्र मनभेद झाले नाही. पुढे अनेक स्थित्यंतरे झाली. यावेळी उमेदवारीसाठी मी इच्छुक होतो.मात्र श्रेष्ठींचा निर्णय कार्यकर्त्यांनी मान्य करायचा असतो. सरांचीही शेवटची निवडणूक असल्याने आम्ही थांबण्याचा निर्णय घेतला. सन १९९५ मध्ये दादांना आमदार करण्यासाठी दाते यांनी सहकार्य केलेले आहे. एखादी शक्ती संपवायची असेल तर त्याग करावा लागतो. आम्ही सर्वांनी एकत्र येऊन दाते यांचा विजय साकारला. तालुक्याची दिशाच बदलली. मी २३ व्या वर्षी राजकारणात आलो. त्या काळात जो ओलावा, जिव्हाळा होता, तो संपत चालला आहे. कार्यकर्त्यांचे नाते निवडणूकीपुरते नसले पाहिजे. निवडणूकीनंतरही जिव्हाळा असला पाहिजे. ते शेवटपर्यंत टिकणे याला संघटना म्हणतात.

सुजित झावरे पाटील
मा. उपाध्यक्ष जि.प.नगर

### सावंत मुंबईत तर दाते पारनेरात !

आ. दाते यांना सर्वात जास्त मताधिक्क्य मी वासुंदे गावात दिले. स्व.दादा आमदार होते. त्यावेळी अशोक सावंत मुंबईत तर काशिनाथ दाते हे पारनेरला अशी स्थिती होती. माझी भुमिका कुठेच नव्हती. ही मिश्किली असल्याचे सांगत फोन करू नका असेही झावरे यांनी अशोक सावंत यांना बजावले.

### पदाधिकाऱ्यांच्या लवकरच नियुक्त्या

दर दोन महिन्यांनी पक्षाची बैठक घेण्यात येऊन आढावा घेण्यात येणार असून विकास कामांवरही चर्चा करण्यात येईल. पक्ष संघटनेच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येणार असून पुढचा मेळावा मंगल कार्यालयात घ्यावा लागेल अशी पक्ष संघटना उभी करू असे अशोक सावंत यांनी सांगितले.

### पक्षसंघटनेच्या जोरावर निवडणूका जिंकल्या

स्व. वसंतरावदादांनी मला सातत्याने संघटनेचे प्रमुख पदे देण्याचा निर्णय घेतला. पक्षाने उमेदवारी दिली नाही म्हणून टाकळी ढोकेश्वर गटामध्ये अपक्ष उमेदवार उभे करून ती अपक्ष निवडणूक जिंकली. पक्षाच्या ही बाब लक्षात आल्यानंतर मुळ काँग्रेस पक्ष दादांच्या नेतृत्वाखाली आला १९९५ मध्ये पक्षाचा तालुकाध्यक्ष म्हणून दादांनी माझ्यावर विश्वास टाकला. तेंव्हापासून सातत्याने संघटनेत काम केले. काँग्रेसमध्ये फुट पडल्यानंतर आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पक्षसंघटना मजबुत बांधली.१९९५ ,१९९९ मध्ये पक्षसंघटनेच्या माध्यमातून विधानसभेची निवडणूक जिंकल्याचे आ. दाते म्हणाले.

### गैरवापर करून माया उभी केली नाही !

स्व. वसंतरावदादांचा माझ्यावर खूप विश्वास होता. ते आमदार असताना तालुक्याचा कारभार मी पाहिला. तालुक्यातील लोक माझ्यातच दादा पहायचे. प्रशासकीय कामांसाठी माझा फोन गेला तर तो माझाच समजुन काम करण्याच्या त्यांच्या सुचना होत्या. त्या अधिकाराचा कधी गैरवापर करून मी माया उभी केली नाही असे आ. दाते यांनी निक्षून सांगितले.

### मी कधीही अप्रमाणिकपणा केला नाही

अनेक वर्षे मी संघटनेसाठी काम केले. ज्या नेतृत्वाबरोबर काम केले त्यासोबत कधीही अप्रमाणिकपणा केला नाही. निष्ठेने,प्रामाणिकपणे काम केले. गैरफायदा घेतला नाही. गेल्या दोन तीन पिढयांशी माझा संबंध आला. दुर्दैवाने अनेक लोक आज आपल्यासोबत नाहीत. सुसंस्कृतपणे काम करणारी ही लोक होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याचा माझा पिंड आहे.

आमदार काशिनाथ दाते
विधानसभा सदस्य

### हे यश महायुतीचे

लोकसभेपासून मी मोकळा होतो. राष्ट्रवादीची उमेदवारी मला उमेदवारी मिळाली. पक्षाच्या केवळ तिन नियुक्त्या होत्या. गावपातळीवर संघटना नव्हती.अशा परिस्थितीत निवडणूक लढवायची होती. योगायोगाने महायुती सोबत होती. सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी ताकद उभी केली. शरद पवार गटासोबत गेलेले कार्यकर्ते अजितदादांसोबत आले. हे यश महायुतीचे आहे. विरोधकांनी पक्ष बदलला, कार्यकर्त्यांची मात्र ससेहोलपट झाली. त्यामुळे विधानसभा निवडणूकीत बदल झाल्याचे दाते यांनी सांगितले.

### जलसंधारणाला प्राधान्य द्या

तालुक्यात १० ते १५ वर्षात जलसंधारणाचा प्रकल्प झाला नाही. त्यापूर्वी काळू,मांडओहळ कालव्यांचे अस्तरीकरण,पिंपळगांव जोगा कालवे, भांडगांव एम.आय.टँक अशी कामे स्व. वसंतदादांनी मार्गी लावली. त्यांच्यानंतर पाणी आडविण्याचे एकही काम झाले नाही. आता आपल्याकडे सत्ता आहे. पाणी आडविण्याचे काम हाती घ्या. महसूल विभागात ऑनलाईन कुपन होत नाहीत. त्याचा त्रास कार्यकर्त्यांना होत आहे. त्यात दुरूस्ती करावी लागेल. ठाकर वस्त्यांमध्ये जातीच्या दाखल्यांचे वितरण करण्यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करावे अशी मागणी सुजित झावरे यांनी केली.

### कार्यकर्त्यांच्या व्यथा जाणून घ्या

कार्यकर्त्यांची व्यथा जाणून घ्यावी. निवडणूक काळात आम्ही संघर्ष केला आहे. काही सभांमध्ये नेते बोलले नाही तरी चालेल आम्हाला बोलण्याची संधी दिली पाहिजे. विधानसभा निवडणूकीमध्ये आमच्या वाडेगव्हाणमध्ये लिड मिळणार नाही असे सांगण्यात येत होते, मात्र आम्ही तिथे २५० मतांची आघाडी दिली आहे. आम्हाला आमच्या भावना मांडण्याची संधी मिळाली पाहिजे.

राजेंद्र शेळके, वाडेगव्हाण

### सुक्ष्म नियोजनातून विजय

राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांच्या सुक्ष्म नियोजनातून काशिनाथ दाते यांचा विजय सुकर झाला. ओबीसी समाज पक्षासोबत आला. विविध योजना मतदारांपर्यंत पोहचविल्या गेल्या. दाते यांना उमेदवारी मिळाल्याने ओबीसी समाजाला आधार मिळाला. ओबीसी समाज सक्रीय झाला.

डी.आर. शेंडगे

### अनौपचारीक बैठक घ्या

कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेण्यासाठी अनौपचारीक बैठक घेण्यात यावी. सर्वांच्या मागण्यांची दखल घ्यावी. प्रवेश केलेल्या व्यक्तिंना न्याय देण्याची भुमीका घेतली पाहिजे. पक्षाचे संघटन वाढविण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत. श्रेय हे एकटयाचे नसते. ते सर्वांच्या प्रयत्नांचे ते फळ असते.

सुधामती कवाद

### तर आमचे नुकसान झाले असते !

चाळीस पंचेचाळीस वर्षांचा दाते यांना अनुभव आहे. ते केवळ १२ दिवसांचे आमदार नाहीत. दाते आमदार झाले नसते तर त्यांचे नुकसान झाले नसते. मात्र आमच्या सारख्या कार्यकर्त्यांचे मोठे नुकसान झाले असते. गावासाठी नेमकी कशाची गरज आहे, तेच कामे व्हावीत, शासनाचा निधी व्यर्थ खर्च होऊ नये.

रामराव गाडेकर

### लाडक्या बहिणींना न्याय द्या

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने तालुक्याची वेगळी ओळख निर्माण केली. लाडकी बहिण योजनेच्या दौऱ्याची सुरूवात पारनेर तालुक्यातून झाली होती. कार्यकर्त्यांची संख्या तुटपुंजी असतानाही हा कार्यक्रम यशस्वी झाला. आमच्या लाडक्या बहिणींनी महायुतीला आणि आपल्यालाही तारले आहे. त्यामुळे दाते यांनी बहिणींना न्याय देण्याची भुमिका घ्यावी अशी मागणी प्रशांत गायकवाड यांनी केली.

### पक्षासोबत उभी राहणारी संघटना उभी करायचीय

व्यक्तिच्या नावाने पक्ष संघटना उभी राहणार नाही. नेत्यासोबत नव्हे तर पक्षासोबत राहणारी संघटना उभी करायची आहे. आजवर विविध गावांमध्ये त्रास झाला. पक्ष बाजूला ठेऊन व्यक्तिपुजा होऊ लागल्याने आम्ही वेगळा निर्णय घेतल्याचे अशोक सावंत यांनी सांगितले.

### दादांना दिलेला शब्द पुर्ण केला

मतदारसंघातून उमेदवार विजयी करू असा शब्द आम्ही अजित पवार यांना दिला होता, तो दाते सरांच्या माध्यमातून आम्ही पुर्ण केला. गाव तिथे शाखा सुरू करण्यासाठी दिलीप दाते यांनी पुढाकार घ्यावा. संघटनेत नवा, जुना असा वाद न करता सर्वांना बरोबर घेऊन काम करा. सहकार चळवळ सक्षम करण्यासाठी काम करावे.

प्रशांत गायकवाड

### गणेश शेळके, नितीन शेळके राष्ट्रवादीत

मा. सभापती गणेश शेळके तसेच युवा सेनेचे मा.तालुका प्रमुख नितीन शेळके यांनी या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. शेळकेव्दयी हे पुर्वी शिवसेनेत होते. मध्यंतरीच्या काळात ते भाजपासोबत होते. पारनेर शहरातील काही तरूणांनीही यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

### राष्ट्रवादीला ६० टक्के जागा

लवकरच जि. प. पं. स.च्या निवडणूका जाहिर होणार आहेत. महायुतीच्या माध्यमातून जि. प.पंचायत समितीची सत्ता राष्ट्रवादीच्या ताब्यात येण्यासाठी तयारी करावी लागणार आहे. गाव तिथे शाखा सुरू करायची आहे. पक्षावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांना न्याय देण्याचे काम केले जाईल. पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसला आमदार म्हणून साठ टक्के जाग मिळणार आहेत. विविध शासकीय समित्यांमध्ये कार्यकर्त्याना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल. प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेऊन आपल्या कार्यकर्त्यांची कामे झाली पाहिजेत अशी सुचना देण्यात याव्यात. तालुक्याला शिस्त लावायची आहे. नीलेश लंके यांनी आगोदर राजीनामा दिल्याने सव्वा कोटी रूपयांचा निधी शिल्लक आहे. आ. दाते यांनी हा निधी मिळविण्यासाठी अजित पवार यांना पत्र द्यावे.

अशोक सावंत
जिल्हाध्यक्ष

### आमचे नाते गुरू शिष्याचे

आ.दाते आणि माझे नाते गुरू शिष्याचे आहे. जिथे सर तिथे आम्ही असणार आहोत. ते ज्या पक्षात असतील आम्ही त्या पक्षासोबत असतो. मी पंचायत समितीमध्ये असताना ते जिल्हा परिषदेमध्ये होते. पक्षात प्रवेश केल्यानंतर जी जबाबदारी दिली जाईल ती यशस्वीपणे पार पाडू. काशिनाथ दाते आमदार झाल्याने सर्वसामान्यांचे स्वप्न पुर्ण झाले आहे.

गणेश शेळके, मा. सभापती




स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार



# वासरांचे व्यवस्थापन

**लहानपणापासूनच वासरांच्या आहाराचे व्यवस्थापन शास्त्रोक्त पद्धतीने केल्यास त्यांची निकोप वाढ होऊन ते उत्पादनक्षम होऊ शकतात. कारण आजची वासरे पुढील उत्पादन देणारी गाय किंवा उच्च प्रतीचा वळू होऊन पशुपालकांचे आर्थिक उत्पन्न वाढवण्यास मदत होते...**

वासरू मातेच्या गर्भाशयात वाढत असते. त्यावेळेपासूनच त्याची योग्य निगा राखल्यास भरपूर आर्थिक फायदा मिळविता येतो. वासरू जन्मल्यानंतर सुरुवातीचा जवळपास ३ ते ४ महिन्यांचा कालावधी हा वासरांसाठी संक्रमणाचा काळ असतो. दुभत्या पशूंचे वासरू प्रथम एकेरी पोटाचे असते. वय वाढत जाईल तसे एकेरी पोटाचे रूपांतर चार भागांत होण्यास सुरुवात होते. यास जवळपास ३ ते ४ महिन्यांचा कालावधी लागतो. वासरांसाठी हा संक्रमणाचा काळ असतो. सुरुवातीच्या पहिल्या तीन महिन्यांत वासरांमध्ये मरतुकीचे प्रमाण ५० ते ६० टक्के असते. त्यामुळे सुरुवातीच्या पहिल्या तीन महिन्यात वासरांचे आहार व्यवस्थापन खूप महत्त्वाचे आहे. नवीन जन्मलेल्या वासरांवर पुढील पिढी अवलंबून असते. अनेक पिढ्यांच्या नियोजनबद्ध प्रजननानंतर जातिवंत गायींची पैदास शक्य होत असते. त्यामुळे जन्मापासूनच वासरांचे पोषण आणि व्यवस्थापन महत्त्वाचे आहे.

## वासरू संगोपनात चिकाचे महत्त्व


गाय व्यायल्यानंतर पहिले २ ते ३ दिवस घट्ट व पोषक दूध देते त्याला चीक असे म्हणतात. दुभत्या जनावरांच्या वासरांमध्ये सुरुवातीचे १८ ते २१ दिवस कोणत्याही प्रकारची स्वतःची रोगप्रतिकारक शक्ती नसते. वासरू जन्मल्यानंतर सुरुवातीच्या ४ ते ६ तासांत आतड्यातून रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे घटक आहे तसे मोठ्या प्रमाणात शोषले जातात. त्यामुळे त्या काळात पुरेशा प्रमाणात चीक पाजणे गरजेचे आहे. चिकामध्ये प्रथिनांचे प्रमाण (साधारणपणे १५ टक्के) साध्या दुधापेक्षा खूप जास्त असते. या प्रथिनांमध्ये मुख्यत्वेकरून ग्लोब्युलिन असते, चिकात असलेले अँटीबॉडीज वासराला गाईकडून मिळालेली तयार रोगप्रतिकारशक्ती देतात. नवजात वासरांच्या शरीरात ही तत्त्व नसताते, त्यामुळे त्यांना चीक पाजलाच पाहिजे. वासराच्या वाढीला लागणारे जीवनसत्वे आणि खनिजे चिकात भरपूर प्रमाणात उपलब्ध असतात. वासराच्या आतड्याच जमा झालेली विष्टा व चिकट पदार्थ बाहेर काढण्यासाठी व पोट साफ करण्यासाठी चीक मदत करते.

## चीक पाजण्याचे प्रमाण

वासरू जन्मल्यानंतर पहिल्या तासात दीड-दोन लिटर चीक पाजणे आवश्यक आहे व पुढील चार ते पाच तासांनी पुन्हा एक ते दीड लिटर चीक पाजावा. सुरुवातीच्या २४ तासांत वासराच्या वजनाच्या १० टक्के चीक पाजावा. चिकयुक्त दूध जास्त प्रमाणात पाजू नये. कारण त्यामुळे अपचन होऊन अतिसार होण्याचा धोका संभवतो. बहुतांश शेतकऱ्यांचा असा समज आहे की, वार पडेपर्यंत चीक पाजणे चुकीचे आहे परंतु असे न करता वासरू उभे राहिले की लगेच चीक पाजावा. पारंपरिक पद्धतीनुसार चीक गायीच्या कासेला पाजले जाते. वासरू जर सरळ कासेतून चीक पीत असेल तर गाईस पहिला माज येण्यास उशीर होतो म्हणून शक्यतोवर चीक निप्पल असलेल्या बाटलीने पाजावा. बाटलीने चीक पाजत असताना चिकाचे तापमान शरीराइतके असले पाहिजे. त्यामुळे चीक काढल्यानंतर लगेच वासरांना पाजावा.



- पाण्याचे नियोजन : बरेचसे पशुपालक वासरांना पहिले २ ते ३ महिने पाणी पाजत नाहीत. वासरांच्या वाढीसाठी आणि कोठी पोटातील किण्वन प्रक्रिया सुरळीत सुरू राहण्यासाठी पाचव्या दिवसापासून पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. पाणी व दूध हे वासराला वेगवेगळ्या भांड्यातूनच पाजावे. जेणेकरून वासराला पाणी व दूध यामधील फरक कळेल, वासरू गरजेपेक्षा जास्त पाणी पिणार नाही. वासरांना स्वच्छ पाणी नेहमी उपलब्ध असल्यास काल्फ स्टार्टर सेवन वाढते. वजन वाढीवर अनुकूल परिणाम दिसून येतो. दूध पाजण्याअगोदर एक तास पाणी देऊ नये. दूध पाजल्यानंतर पाणी दोन तासांनी द्यावे. पाण्याचे तापमान हे वासराच्या शरीराच्या तापमानाएवढेच असावे. त्यासाठी हिवाळ्यात पाणी थोडे कोमट करून द्यावे. उन्हाळ्यात थंड पाणी द्यावे. पाणी आणि पिण्याचे भांडे दोन्हीही स्वच्छ असावे, जेणेकरून घाण वासराच्या पोटात जाणार नाही. वासराला आजार होणार नाही.
- मिल्क रिप्लेसर : वासराला पिण्यासाठी दुधाला पर्याय म्हणून किंवा काही प्रमाणात दुधाची मात्रा कमी करून दुधाऐवजी दूध भुकटी आणि इतर अन्नघटक एकत्रित करून तयार केलेल्या कोरड्या व पावडर स्वरुपातील मिश्रणाला मिल्क रिप्लेसर असे म्हणतात. मिल्क रिप्लेसर पाण्यात मिसळून वासरांना दिले जाते. मिल्क रिप्लेसर दुधासारखेच पौष्टिक असते. वासरांच्या पचनसंस्थेची भौतिक व शारीरिक वाढ चांगली होण्यासाठी मिल्क रिप्लेसर उत्तम असते. मिल्क रिप्लेसर दुधाच्या किमतीपेक्षा स्वस्त असल्यामुळे दुधाची बाजारात विक्री करून पशुपालकास आर्थिक फायदा होतो.
- काफ स्टार्टर : काफ स्टार्टर हे वासरांचा बालआहार असून दूध किंवा इतर पातळ पदार्थांवर वाढणाऱ्या वासरांसाठी पूरक पोषकद्रव्ये यांचे घन स्वरूपातील मिश्रण आहे. यामध्ये मुख्यतः मका किंवा ओट्ससारखी धान्ये, तेलबिया आणि इतर धान्यापासून बनवलेले तसेच



जीवनसत्वे, खनिजे, प्रतिजैविके यांचे मिश्रण असते. दर्जेदार मिश्रखाद्यात ७५ ते ८० टक्के एकूण पचनीय घटक आणि २२ ते २५ टक्के प्रथिने असावे. वासरांना काफ स्टार्टर वयाच्या दुसऱ्या आठवड्यापासून ते चार महिने वयापर्यंत द्यावे. यामुळे वासरांचे कोठीपोट लवकर कार्यान्वित होण्यास मदत होते आणि रवंथ प्रक्रिया लवकर सुरू होण्यास मदत होते. काफ स्टार्टरची सुरुवात १०० ग्रॅमपासून करून हळूहळू प्रमाणात वाढ करून चौथ्या महिन्यापासून वासरांना प्रती दिन दोन किलोपर्यंत काफ स्टार्टर देता येते.
- सुका चारा : वयाच्या दुसऱ्या आठवड्यापासून वासरांना सुका चारा दररोज देण्यास सुरुवात करावी. हळूहळू चाऱ्याचे प्रमाण वाढवावे. सुक्या चाऱ्यात तंतुमय पदार्थ अधिक असल्याने पचनासाठी कोठीपोटातील स्नायूंची कार्यक्षमता वाढून रवंथ प्रक्रिया लवकर सुरू होण्यास मदत होते. सुका चारा हा उच्च प्रतीचा, रंग व चव चांगली असलेला असावा. त्यात धूळ, काळेपणा किंवा बुरशी नसावी व लुसलुशीत काड्या असाव्यात. वासरांना मेथीघास, बरसीम सारखा गवताचा सुका चारा वासरे आवडीने खातात.
- हिरवा चारा : वासरांना वयाच्या तिसऱ्या आठवड्यापासून थोडा हिरवा चारा देण्यास सुरुवात करावी. वयानुसार हिरव्या चाऱ्याचे प्रमाण वाढवावे. सहाव्या महिन्यात प्रती दिन ५ ते १० किलो हिरवा चारा देता येईल. चांगल्या प्रतीचा एकदल आणि द्विदल चारा द्यावा, जेणेकरून वासरांची वाढ जोमाने होईल.
- आरोग्य व्यवस्थापन : गोचीड निर्मूलन आणि वासरांचा थंडी व वाऱ्यापासून बचाव या सोबतच पशुवैद्यकांच्या सल्ल्यानुसार वासरांना लिव्हर टॉनिक, जीवनसत्त्व टॉनिक, जंतनाशक औषधे द्यावीत. तसेच गोठ्यात खनिज मिश्रणांच्या चाटण विटा वापराव्यात, जेणेकरून त्यांचे आरोग्य निरोगी राहील. वासरांच्या वजनाची नियमित नोंद घ्यावी.

## कृत्रिम चीक

**जर गाय आजारी असेल, विताना दगावली असेल, गाईस कासदाह असेल तर वासराला नैसर्गिक चीक मिळू शकत नाही.अशावेळी आपण त्याच वेळेस त्याच गोठ्यातील विलेल्या दुसऱ्या गाईचा चीक किंवा कृत्रिम चीक तयार करून पाजावा.**

## आहार व्यवस्थापन

**चांगली वाढ आणि अधिक प्रतिकारशक्ती येण्यासाठी दूध आणि खुराक यांचा वासरांच्या आहारात समावेश अत्यंत गरजेचे असते. वजन लवकर वाढण्यासाठी रवंथ प्रक्रिया लवकर सुरू होणे आवश्यक आहे.**

## दुधाचे फायदे

वासराची सुरुवातीची वाढ चांगली होण्यासाठी योग्य प्रमाणात दूध पाजणे गरजेचे आहे. सुरुवातीच्या दिवसांत वासरामध्ये चारा किंवा इतर आहार पचवण्याची क्षमता नसते. सुरुवातीच्या दिवसात वासराच्या पोटाची रचना ही खास दूध पचवण्यासाठी बनवलेली असते. वासराच्या शारीरिक वाढीसाठी लागणारे सर्व घटक दुधामध्ये योग्य प्रमाणात असतात. सुरुवातीचे २१ दिवस वासराच्या वजनाच्या १० टक्के दूध दिवसातून २ ते ३ वेळा विभागून पाजले गेले पाहिजे. बाविसाव्या दिवसापासून दुधाचे प्रमाण वासराच्या वजनाच्या १/१५ करून १०० ग्रॅम काल्फ स्टार्टर आणि थोड्या प्रमाणात चांगल्या प्रतीचा सुका चारा द्यावा. पस्तिसाव्या दिवसापासून २ महिन्यांपर्यंत वासराच्या वजनाच्या १/२० (५ टक्के) दूध आणि २५० ग्राम काल्फ स्टार्टर आणि खाईल तेवढा सुका चारा द्यावा. वयाच्या दुसऱ्या महिन्यापासून दूध हळूहळू कमी करून ३ महिने होईपर्यंत बंद करावे. याच काळात काल्फ स्टार्टर वाढवून ५०० ग्राम एवढे करावे. सुका चारा मुबलक प्रमाणात द्यावा. पारंपरिक पद्धतीनुसार दूध गायीच्या कासेला पाजले जाते. परंतु, दुग्धव्यवसायात असे करणे शक्य नसल्यामुळे अशा वेळेस दूध रबरी निप्पल असलेल्या बाटलीने पाजावे. कासेला दूध पाजल्यास नैसर्गिक भावना जागृत होऊन वासराच्या तोंडात भरपूर प्रमाणात लाळ तयार होते. दूध सरळ पोटाच्या चौथ्या कप्प्यात जाते. परंतु, या पद्धतीत वासराला दूध मोजून देता येत नाही व गाईला वासराची सवय लागते. रबरी निप्पल असलेल्या बाटलीने दूध पाजल्यास दूध सरळ चौथ्या कप्प्यामध्ये जाते. वासराला नैसर्गिकरित्या दूध पिल्याची जाणीव होते. या पद्धतीत दूध मोजून पाजता येते, गाईला व वासराला एकमेकांची सवय होत नाही. जमिनीवरून बादलीने किंवा टोपल्याने दूध पाजल्यास ते पोटाच्या पहिल्या कप्प्यात



(रूमेन) मध्ये जाते व दुधाचे योग्य पचन होत नाही म्हणून दूध निप्पल असलेल्या बाटलीनेच तोंडा एवढ्या उंचीवरून पाजल्यास ते पोटाच्या चौथ्या कप्प्यामध्ये जाते, तेथे त्याचे योग्य पचन होते.



# नवजात वासरांतील मरतूक टाळण्यासाठी...

**जनावरांची प्रसुतिपूर्व व प्रसुतीनंतर विशेष काळजी घेणे गरजेचे असते. तसेच व्याल्यानंतर मादीसोबतच नवजात वासराची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. काही वेळेस वासरू जन्माच्या वेळी मानवी साह्यतेची गरज भासते. अशा वेळी वासरू कमजोर असण्याची दाट शक्यता असते. बऱ्याच वेळा नवजात वासरांची व्यवस्थित काळजी न घेतल्याने त्यांच्यातील मरतुकीचे प्रमाण वाढलेले दिसून येते. नवजात वासरांतील मरतूक टाळण्यासाठी योग्य व्यवस्थापन पद्धती आणि काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे...**

प्रसुतीवेळी नवजात वासरू व मादी यांचे योग्य व्यवस्थापन न केल्यास किंवा निष्काळजीपणा केल्याने दुग्धोत्पादन व्यवसायामध्ये नुकसान होऊ शकते. जसे की मादी जनावर संपूर्ण गर्भधारणा कालावधीसाठी वासरास तिच्या गर्भाशयात ठेवते. परंतु व्यायच्या वेळेस योग्य काळजी न घेतल्यास तितका कालावधी व्यर्थ जातो. मादी दूध देणे बंद किंवा कमी करते, वासरापासून (नर/मादी) भविष्यात मिळणारे उत्पन्न गोठते. त्यासाठी व्यायल्यानंतर वासराची व मादीची योग्य काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.



## घ्यावयाची काळजी

- विल्यानंतर नवजात वासराची योग्य तपासणी करून घ्यावी. नाक, तोंड, श्वासनलिका, गुदद्वार तपासून पाहावेत. बेंबीच्या ठिकाणी रक्तस्राव येत आहे का, याची तपासणी करावी. काही नवजात वासरांचे गुदद्वार हे बंद असते. अशा वेळेस त्वरित पशुवैद्यकांस संपर्क करावा.
- वासरू जन्माला आल्याबरोबर लगेच त्याच्या नाका-तोंडातून चिकट द्रव्य दूर करावा. जेणेकरून त्याला श्वास घेण्यास मदत होईल.
- वासरू जन्मल्यानंतर ते मादीच्या जवळ ठेवावे. जेणेकरून मादी वासराला चाटून चिकट द्रव्य साफ करेल. गायीने वासराला चाटल्याने त्यांच्यातील रक्ताभिसरणास चालना मिळते.
- बऱ्याच वेळेस पहिल्यांदा विणाऱ्या जनावरांमध्ये मातृ-वृत्तीचा अभाव असल्याने ते नवजात वासरांना चाटत नाहीत. तसेच जवळसुद्धा घेत नाहीत. अशा वेळी नवजात वासरांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.
- कोरड्या कापडाने वासराच्या नाकातोंडातील चिकट द्रव्य काढून नाक व तोंड स्वच्छ करून घ्यावे.
- वासराला श्वसनास त्रास होत असल्यास काही वेळ पाठीमागचे पाय उचलून (घड्याळाच्या लोलकाप्रमाणे) उलटे लटकवावे. जेणेकरून त्यांच्या नाकातील चिकट द्रव्य बाहेर निघून जाण्यास मदत होईल.
- कमजोर वासरांना श्वासोच्छ्वास करण्यास त्रास होत असल्यास, कोरड्या कपड्याने स्वच्छ पुसून घेतल्यानंतर हाताच्या तळव्याने वासराच्या छातीवर हलका दाब देऊन रक्ताभिसरणास चालना द्यावी. कृत्रिम श्वासोच्छ्वास द्यावा.



- नवजात वासरांमध्ये शरीराचे तापमान नियंत्रित करण्याची क्षमता विकसित झालेली नसते. त्यामुळे त्यांना कोरड्या व उष्ण ठिकाणी ठेवावे. हिवाळ्यामध्ये याबाबत विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. नवजात वासरांना उबदार ठिकाणी ठेवावे किंवा त्यांच्या शरीराभोवती उबदार कापड गुंडाळावे.
- बऱ्याच वेळेस वासराची नाळ ही खूप लांब असते. नाळेमध्ये जंतुसंसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. त्यासाठी लांब नाळ जंतुनाशक द्रावणाने (पोटॅशिअम परमँगनेट, टिंचर आयोडीन द्रावणाने) स्वच्छ करून, बेंबीपासून दोन इंचाच्या अंतरावर बांधून घ्यावी. त्याखालून ती नवीन ब्लेडने कापून टाकावी.
- नवजात वासरांना पहिल्या दोन तासांमध्ये चिकाचे दूध पाजावे. हे दूध वासरांमध्ये रोगप्रतिकारक्षमता वाढवण्यासाठी खूप महत्त्वाचे असते. वासरांच्या शरीराच्या वजनाच्या एक दशांश दराने चीक पाजावा. या चिकाच्या दुधामध्ये विविध इम्युनोग्लोबुलीन असतात. ही इम्युनोग्लोबुलीन (रोगप्रतिकारक सत्त्वे) नवजात वासरांचे विविध रोगांपासून संरक्षण करतात.
- काही वेळेस मादीचा मृत्यू झाल्यास नवजात वासरांना चिकाचे दूध मिळत नाही. अशा वेळी उपलब्ध असल्यास इतर जनावरांचे किंवा कृत्रिम पद्धतीने तयार केलेले चिकाचे दूध वासरांना द्यावे.
- मातेचे चिकाचे दूध हे तिलाच पाजू नये. त्यामुळे मादीमध्ये आम्लारी अपचन होते व पुढील पचनक्रिया थांबते. यावर वेळीच उपाययोजना न केल्यास गंभीर आजार होऊन जनावराचा मृत्यू होण्याची शक्यता असते.
- गायी विल्यानंतर गायीला व वासराला स्वच्छ व कोरड्या ठिकाणी ठेवावे. वासराला योग्य प्रमाणात दूध देणे आवश्यक आहे. दूध जास्त प्रमाणात दिल्यास, हगवण लागण्याची शक्यता असते. तसेच अगदी कमी प्रमाणात दूध दिल्यास, वासरे कमजोर होतात व मरतुक होण्याची शक्यता वाढते.
- कमजोर वासरे दूध पीत नसल्यास त्यांना बाटलीच्या साह्याने दूध पाजावे. योग्य नियोजन व व्यवस्थापन केल्यास गायी वर्षाकाठी एक तर म्हशी दीड वर्षातून एकदा वासरू जन्माला घालतात.

## कृत्रिम पद्धतीने चिकाचे दूधनिर्मिती

| पदार्थ | प्रमाण |
|---|---|
| कोमट पाणी | २७५ मि.लि. |
| साधे कच्चे अंडे | १ |
| एरंडेल तेल | ३ मि.लि. |
| जीवनसत्त्व अ | १०००० आययू |
| गरम दूध | ५२५ मि.लि. |
| ऑरिओमायसिन (प्रतिजैविक) | ८० मिलिग्रॅम |

## शॉर्ट न्यूज

### ध्येय रत्न पुरस्काराने संतोष कानडे सन्मानित

■ **नगर :** न्यू आर्टस् कॉमर्स अॅण्ड सायन्स महाविद्यालयाचे प्रशासकीय कर्मचारी व सामाजिक कार्यकर्ते संतोष पोपटराव कानडे यांना ध्येय रत्न राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. ध्येय उद्योग समूह पुणे संस्थेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान सोहळ्यात पुणे येथील श्रमिक पत्रकार भवनात झालेल्या कार्यक्रमात त्यांना साहित्यिक रामचंद्र जोरवर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

### काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश

■ **कोपरगाव :** शिवसेनेचे जिल्हा प्रमुख नितीन औताडे यांच्या उपस्थितीत कोपरगावातील काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी शिवसेना पक्षाचे प्रदेश प्रमुख संजीव भोर म्हणाले, मुख्यमंत्रीपदाची अडीच वर्षे जबाबदारी सांभाळताना शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी सर्वसामान्य जनतेची सेवा केली. तळागाळातील जनतेपर्यंत विविध योजना पोहोचविल्या, त्यांच्या कामावर प्रभावित होऊन शिवसेनेमध्ये मोठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे, असे सांगत, पक्ष संघटनेसाठी उपमुख्यमंत्री शिंदे ताकद देणारे नेतृत्व आहे.

### विवाहितेचा छळ; पतीसह ७ जणांवर गुन्हा दाखल

■ **नेवासा :** सासरी नांदत असताना दवाखान्यासाठी माहेरून तीन लाख रुपये आणावेत यासाठी विवाहितेचा छळ केल्याची घटना तालुक्यातील खुपटी येथे घडली असून पतीसह ७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत तारा रवींद्र डुकरे यांनी फिर्याद दिली. सासरी नांदत असताना पती रवींद्र डुकरे, सासरा रामदास डुकरे, सासू संगीता डुकरे, दीर सागर डुकरे, नणंद लक्ष्मी शिंदे, मिना शिंदे, कुसुम सोमनाथ गायकवाड, यांनी मला शिवीगाळ करुन, लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शारिरीक व मानसिक त्रास दिला आहे. या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नगरकडे जाणाऱ्या वाहनातून गॅस गळती

■ **राहुरी :** राहुरीकडून नगरकडे जात असलेल्या गॅस वाहतूक करणाऱ्या वाहनाच्या टाकीमधून अचानक गॅस गळती सुरू झाली. यावेळी राहुरी पोलिस पथक तसेच कृषी विद्यापीठाचे सुरक्षा रक्षक कर्मचारी यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतल्याने मोठा अनर्थ टळला. दि.२६ डिसेंबर रोजी दुपारी दीडवाजे दरम्यान गॅस वाहतूक करणारे एक वाहन राहुरीकडून नगरकडे जात होते. राहुरी खुर्द परिसरात असलेल्या धरमाडी टेकडी परिसरात वाहनातील गॅसच्या टाकीमधून अचानक गॅस गळती सुरू झाली.

### प्रेम संबंधातून युवकाचा खून चौघांना अटक

■ **कर्जत :** तालुक्यातील नांदगाव शिवारामध्ये २३ डिसेंबरला कुकडी कालव्यामध्ये मृतदेह आढळला होता. हा खून प्रेम संबंधातून झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असून पोलिसांनी एका महिलेसह चौघांना मंगळवारी अटक केली. बीड येथील रणजीत सुनील गिरी असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. याप्रकरणी संतोष बाबुराव जाधव ऋषिकेश रवी बोरकर उद्धव उर्फ संतोष मांडगे आणि खांडवी येथील महिलेला अटक करण्यात आली आहे.

# आपल्याकडे शस्त्र आहे म्हणायला लाज वाटते!

**मी माझी बंदूक शासनाला परत करणार | बीडमधील शस्त्र प्रदर्शन पाहिल्यावर प्रकाश महाजन यांचा निर्णय**



**बीड : प्रतिनिधी**

**बीडमधील गुन्हेगारी तसेच शस्त्राचे प्रदर्शन करत ज्या काही गोष्टी समोर येत आहेत. या सगळ्या घटना पाहता आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते प्रकाश महाजन यांनी मोठा निर्णय घेतला आहे. प्रकाश महाजन यांनी आता त्यांच्या जवळील असलेली बंदूक शासनाला परत करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच निवडणूक काळात शासनाकडे जमा केलेली बंदूक आता परत घेणार नसल्याचे देखील त्यांनी जाहीर केले आहे.**

एका वृत्तवाहिनीशी बोलताना मनसे नेते प्रकाश महाजन म्हणाले, अंजली दमानिया यांनी ज्या गोष्टी सांगितल्या म्हणून मला असे वाटत आहे की मी माझा शस्त्र परवाना शासनाला परत करायच्या मन:स्थिती आहे. ज्यांच्याकडे शस्त्र आहेत त्यांनी त्याचे इतके बंगाळवाने प्रदर्शन केले आहे की आपल्याकडे शस्त्र आहे हे सांगायला आता लाज वाटत आहे. लोकांना धमकावण्यासाठी शस्त्र दिली आहेत का? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला.

प्रकाश महाजन म्हणाले, अंजली दमानिया यांचे मी आभार मानतो असेही महाजन म्हणाले आहेत. मी आज बीडला आहे, छत्रपती संभाजीनगरला जाऊन मी माझे शस्त्र आणि परवाना पोलिस कमिशनर यांना देणार आहे. फक्त एक विनंती करतो की शासनाने त्या शस्त्राला योग्य भावात विकत घ्यावे आणि त्यातून येणाऱ्या दोन पैशांचा मला उपयोग व्हावा एवढी विनंती मी करतो.

पुढे बोलताना प्रकाश महाजन म्हणाले, २३ तारखेला मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मी बरेच वर्ष बीड जिल्ह्यात राहिलो आहे. मी येथील परिस्थिती त्यांना सांगितली आणि सक्षम पोलिस अधिकारी जिल्ह्यात देण्यात यावा अशी मी त्यांना विनंती केली आहे. बीड जिल्ह्यातील वाळू माफिया यांच्यावर खिळ बसली तर निश्चित या गुन्हेगारीला आळा बसेल.

दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बीडमधील गुन्हेगारीवर चांगलेच हल्लाबोल सुरू केले आहेत. धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्यावर त्यांनी निशाणा साधण्यास सुरू केले आहे. त्यांच्या समर्थकांकडे शस्त्र असल्याचे पुरावे देखील त्यांनी ट्विट करत सर्वांसमोर आणले आहे. यावर आता शासन काय कारवाई करणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

# मुंबईतून अपहरण झालेल्या चिमुकल्याची श्रीरामपुरात सुटका

## पाच आरोपी नवी मुंबई पोलिसांच्या ताब्यात

**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**कामोठे, नवी मुंबई येथून अपहरण केलेल्या एका बालकाची तांत्रिक माहितीच्या आधारे येथील पोलिसांनी नुकतीच सुखरुप सुटका केली. अपहरण झाल्यानतंर अवघ्या आठ तासाच्या आत त्या बालकाची सुखरुप सुटका करण्यात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेसह श्रीरामपूर शहर पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी पाच आरोपींना पकडून नवी मुंबई पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.**



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, गुरूवारी (ता.२६) सकाळी ८ वाजेच्या सुमारास मोरे हॉस्पीटल पाठीमागील मैदान, मोठाखांदा कामोठे (ता. पनवेल, नवी मुंबई) येथून सात वर्ष वयाच्या एका बालकाचे काही अज्ञात इसमांनी अज्ञात कारणाकरीता फुस लावून पळवून नेल्याबाबत बालकाच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरुन कामोठे पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने नमुद बालकाचा शोधाकरीता नवी मुंबई पोलिसांकडून सर्व महाराष्ट्रातील पोलीस नियंत्रण कक्षांना कळविले होते. नमुद अपहृत बालक यास घेवून अपहरणकर्ते हे अहिल्यानगर जिल्ह्यात येण्याची दाट शक्यता असल्याबाबत पोलीस अधीक्षक यांना पनवेल, नवी मुंबईच्या पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर यांनी कळविले होते.

त्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात अपहृत बालकाचा व अपहरणकर्ते यांचा शोध घेण्याबाबत पोलीस अधिक्षक यांनी सर्व पोलीस ठाण्यांना तसेच स्थानिक गुन्हे शाखेस आदेश दिले होते.दरम्यान, तांत्रिक माहितीच्या आधारे अपहरणकर्ते हे संगमनेर रोडने नेवासेच्या दिशेने जात असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा व श्रीरामपूर शहर पोलीस पथकाने नाकाबंदी तसेच पाठलाग करून अपहरणकर्ते हे अपहृत बालकास घेवून जात असलेले वाहन टाकळीभान येथे अडवून त्यातील अपहृत बालकाची सुखरूप सुटका केली. तसेच सदर बालकास फुस लावून घेवून जात असलेले विलास रामु इंगळे, अक्षय आबासाहेब म्हस्के, बाबासाहेब चिनप्पा पोळमाळी, कैलास रामू इंगळे, प्रसाद गंगाधर कुटे (सर्व रा. कुकाणा, ता. नेवासा) यांना ताब्यात घेवून त्यांना नवी मुंबई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, पोलीस उपनिरीक्षक रोशन निकम, पोलीस शिपाई संभाजी खरात, रामेश्वर तारडे, अजित पटारे, स्थानिक गुन्हे शाखा पथकाचे पोलीस हवालदार शिंदे, पोलीस नाईक दरंदले, पोलीस शिपाई शिरसाठ, ससाणे तसेच अप्पर पोलीस अधिक्षक कार्यालयातील पोलीस नाईक सचिन धनाड, पोलीस शिपाई रामेश्वर वेताळ यांनी केली आहे

**वाचकांच्या लेखणीतून**

# हे आव्हान महाराष्ट्र सरकारने पेलून दाखवावेच!

मेरे दिल के किसी कोने में
एक मासूम-सा बच्चा है
बड़ों की देखकर ये दुनिया
जो बड़ा होने से डरता है!

कल्याणमध्ये अल्पवयीन मुलीची अत्याचार करून अमानुष हत्या अशी समाजविघातक वृत्तपत्रीय बातमी वाचनात आली. आरोपी विशाल गवळी याने बारा वर्षीय बालिकेवर अत्याचार करून तिची अमानुषपणे हत्या केली. तिच्या शवाची विल्हेवाट लावण्यासाठी त्याची पत्नी आणि त्याच्या रिक्षावाल्या मित्राने साह्य केले. पत्नीचे सहकार्य या बाबतीत अपेक्षित नव्हते. कदाचित् तिने नवऱ्याला घाबरून हे सहकार्य केले असावे. या तिघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे कळते.

कल्याण जवळील बदलापूरमध्ये काही दिवसांपूर्वी दोन शाळकरी मुलींवर अत्याचार झाले होते. पुणे जिल्ह्यातील राजगुरुनगर येथील दोन अल्पवयीन सख्ख्या बहिणींवर ५४ वर्षीय परप्रांतीयाने अत्याचार केला. मारहाण केली. त्यांची डोकी पाण्यात बुडवून त्यांना जिवानिशी ठार केले. आता ही जिवाचा थरकाप उडविणारी आणखी एक दुर्घटना घडली आहे. जनसामान्य सरकारी पक्षाला बोल लावत आहेत.



अशा गोष्टी समाजविघातक असल्याने समाजविकासाला बाधकही आहेत. २७ डिसेंबरच्या महाराष्ट्र टाइम्स दैनिकाने असुरक्षित मुलींचा महाराष्ट्र या आपल्या अग्रलेखात म्हटले आहे, जनजागरण आणि पोलिस यंत्रणेचा धाक या दोन्ही आघाड्यांवर गंभीरपणे काम केले तरच महाराष्ट्रात मुली सुरक्षित राहतील. हे आव्हान राज्य सरकारने पेलून दाखवावे. ही जनता आणि सरकार यांनी चिंतन करण्याची आणि अमलात आणण्याची गोष्ट आहे. म्हणून हे आव्हान महाराष्ट्र सरकारने पेलून दाखवावेच!


**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# प्रवरा नदीपात्रातील बंधाऱ्यात शेकडो मासे मृत्युमुखी

**परिसरात दुर्गंधी पसरली, मृत्यूचे कारण अस्पष्ट**

**कोल्हार : प्रतिनिधी**

**मांडवे-गंगापूर येथील प्रवरा नदीपात्रातील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्या शेकडो मासे मृत पावल्याचे निदर्शनास आले आहे. या मृत माशांमुळे परिसरात मोठी दुर्गंधी परसली आहे. मासे मृत्युमुखी पडण्याची वर्षभरातील ही दुसरी घटना असून नागरिकांसह पर्यावरणप्रेमींकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे. प्रवरा नदीपात्रातील मासे नेमके कशामुळे मृत पावले, हे अद्याप समजू शकलेले नाही.**



प्रवरा नदीपात्रातील मासे मृत्युमुखी पडल्याने पाण्यावर मासे तरंगताना आढळले आहेत. या मृत माशांची दुर्गंधी मात्र नदीकाठावरील दोन्ही बाजुंच्या गावात पसरली आहे. कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याजवळ पाणी अडवले गेले असल्यामुळे पाठीमागे मांडवे-गंगापूर पुलापर्यंत पाणी साठवण्यात आले आहे. या बंधाऱ्यातील जलपर्णी तसेच मृत मासे कुजल्याचे दिसून येत आहे. तीन दिवसांपासून नदीपात्रात मृत्युमुखी पडलेल्या माश्यांचा थर साठला असल्याने दुर्गंधी सुटली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. आजुबाजुच्या गावातील ग्रामस्थांना उलट्या व मळमळीचा त्रास होत आहे.

कोल्हार परिसरातून ड्रेनेजचे पाणी तसेच केमिकलयुक्त पाणी दिवसाढवळ्या नदीपात्रात सोडले जाते आहे. त्यामुळे त्याचा परिणाम जलचरांवर होत असल्याची चर्चा दबक्या आवाजात नागरिकांमध्ये सुरू आहे. प्रदूषण महामंडळाने याकडे त्वरित लक्ष द्यावे, अशी मागणी परिसरातील गावांतून केली जात आहे. मासेमारी करणाऱ्या लोकांनी मिळेल तेवढे लहान-मोठे मासे बाजारात विक्रीसाठी नेले असल्याची चर्चा परिसरात होती. त्यामुळे ही मासे खाणाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. दरम्यान, बंधाऱ्यातील पाण्यावर तेलकट तवंग आला असून पाणी काळेभोर झाले आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळाने पाण्याची नमुने तपासून यामागील कारण शोधावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# खातेवाटपानंतरही मंत्री मंत्रालयात फिरकेनात !

## | काही जणांनी अद्याप पदभारही स्वीकारला नाही | नवीन वर्षामध्येच कामकाज सुरळीत होण्याचा अंदाज

**मुंबई : प्रतिनिधी**

**नागपूरच्या गुलाबी थंडीत महायुती सरकारचे अधिवेशन पार पडल्यानंतर लगेच मंत्रिमंडळाचा विस्तार आणि त्यानंतर खात्याचे वाटप झाले. मात्र,अद्याप पाहिजे त्या प्रमाणात मंत्रालयामध्ये मंत्र्यांसह नागरिकांची वर्दळ दिसून येत नाही. बोटावर मोजण्याइतके मंत्री जर सोडले तर अद्याप इतर मंत्र्यांची मंत्रालयात फिरकलेसुद्धा नाहीत. त्यामुळे मंत्रालयातील संपूर्ण परिसर शांततामय दिसून येत आहे.**




शिवाय, मंत्रालयातील कामकाज धिम्या गतीने सुरू आहे. सर्वात आधी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी पदभार स्वीकारला, त्यानंतर चंद्रकांत पाटील, गणेश नाईक, पंकजा मुंडे, नितेश राणे, आकाश फुंडकर तर आशिष शेलार अशा मोजक्या मंत्र्यांनी पदभार मंत्रालयात येऊन स्वीकारला आहे. मात्र, अद्यापही अनेक मंत्र्यांनी पदभार स्वीकारला नाही. मंत्रिपदाची शपथ आणि त्यानंतर झालेल्या खातेवाटपानंतर आपापल्या मतदारसंघाचा दौरा आणि शुभेच्छा स्वीकारण्यातच मंत्री व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नवीन वर्षातच महायुती सरकारच्या कारभाराला वेग येणार असल्याचे दिसते.

राज्यभरातून नागरिकांची आपल्या कामासाठी नेहमी लागणारी सुमारे २ किलोमीटरची रांग सध्या दिसत नाही. तर अधिकाऱ्यांची ५०० मीटर परिसरात लागणारी रांग नाही. तर मंत्रालयाच्या प्रवेशासाठी पासची मारामारीसुद्धा दिसत नसून मंत्रालयाच्या प्रवेशद्वारासह प्रवेश पास देणाऱ्या खिडक्यांवर गर्दी नाही. इतर वेळी पास मिळवण्यासाठीच सामान्य नागरिकांसह अधिकारी, पत्रकारांना रांगा लावण्याचे चित्र दिसत नाही.

# परप्रांतीय कामगारांची पडताळणी करा

## मनसे नेते अविनाश पवार यांची मागणी



**सुपा : प्रतिनिधी**

**सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीमध्ये परप्रांतीय कामगारांची संख्या वाढत असून त्यांचे हे वाढते प्रमाण सुपा तसेच परिसरातील गावांतील नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक ठरत आहे. प्रशासनाने सर्व परप्रांतीय कामगारांची पडताळणी करून त्याच्या नोंदी ठेवण्याची मागणी मनसे नेते अविनाश पवार यांनी केली आहे.**

परप्रांतीय कामगारांना कायद्याचा धाक राहीला नसून ते दारूचे सेवन करून या परिसरात मुक्त संचार करतात. त्यांच्या वास्तव्याची कोणतीही नोंद नाही. बनावट आधार कार्डच्या माध्यमातून स्थानिक एजंटांचया माध्यमातून हे लोक औद्योगिक वसाहतींमधील कंपन्यांमध्ये काम मिळवितात. कोणतीही पोलीस पडताळणी न करता या लोकांना रोजगार दिला जात असल्याने गुन्हेगारी प्रवृत्तीचे कामगारही या औद्योगिक वसाहतीमध्ये सहज काम मिळवत असल्याचा आरोप पवारांनी केला आहे.

### तर मनसे मज्जाव करणार

आठ दिवसांत परिसरातील महिलांच्या सुरक्षितेसाठी तसेच गावांच्या सुरक्षिततेसाठी परप्रांतीय कामगारांची पोलीस पडताळणी करून प्रशासनाने तसा खुलासा करावा. तसे झाले नाही तर पोलीस पडताळणी नसणाऱ्या कामगारांना महाराष्ट्र नव निर्माण सेना कोणत्याही कंपनीमध्ये कामासाठी प्रवेश करू देणार नाही. होणाऱ्या परिणामांना पोलीस व कंपनी प्रशासन जबाबदार राहील.

अविनाश पवार, मनसे नेते

### महिलांची सुरक्षितता ऐरणीवर

परप्रांतीयांनी या परिसरातील तरूण मुली, महिला यांना फुस लाऊन पळवून नेल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. दिवसेंदिवस औद्योगिक वसाहत परिसरात भुरट्या चोऱ्या वाढल्या असून त्याला हेच परप्रांतीय कामगार कारणीभुत आहेत.

### पडताळणी बंधनकारक करा

परप्रांतीय कामगार ज्या गावांमध्ये वास्तव्यास आहेत, त्या गावाच्या ग्रामपंचायतींनी संबंधित कामगारांना पोलीस पडताळणी बंधनकारक करावी. पोलीस पडताळणी नसेल तर त्यांना गावामध्ये राहण्यास किंवा कंपनीमध्ये काम करण्यास मज्जाव करण्यात अशी मागणी अविनाश पवार यांनी केली आहे.

# लंके प्रतिष्ठानची सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून सेवा

## सरपंच प्रकाश राठोड यांचे मत | पळशी येथे मोफत नेत्र तपासणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया चष्मे वाटप शिबिर

**पळशी : प्रतिनिधी**

**खासदार नीलेश लंके व नीलेश लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून नेहमीच समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात.मतदार संघात मोफत नेत्र तपासणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच चष्मे वाटप शिबिर आयोजित करण्यात आले खऱ्या अर्थाने सर्वसामान्य व्यक्तीला केंद्रबिंदू मानूनच लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून सेवा दिली जात आहे असे समाज उपयोगी काम निरंतर सुरू राहावे असे मत पळशी गावचे लोकनियुक्त सरपंच प्रकाश राठोड यांनी व्यक्त केले.**

पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील ऐतिहासिक गाव समजल्या जाणाऱ्या पळशी येथे नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य



साधत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पळशी गावचे सरपंच प्रकाश राठोड यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले उपस्थित डॉक्टर तसेच कर्मचारी यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना सरपंच राठोड म्हणाले पळशी येथे आदिवासी समाज जास्त आहे नीलेश लंके यांच्या माध्यमातून नेहमीच या भागात विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असतात या उपक्रमांच्या माध्यमातून दीन दलित आदिवासी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सेवा पोहोचविण्याचे काम होत आहे तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे विचार व शरद पवार यांचे विचार सर्व सामान्य जनतेपर्यंत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी नीलेश लंके यांचा नेहमी प्रयत्न राहिला आहे. आमदार व खासदारकीच्या माध्यमातून खा.लंके यांनी विकास कामांना नेहमीच पाठबळ दिले आहे पळशी येथे त्यांच्या माध्यमातून अनेक विकास कामे मार्गी लागल्याचे श्री.राठोड यांनी सांगितले.

# महिलांमध्ये कर्करोगाचे प्रमाण जास्त; नियमीत तपासणीची गरज

## सरपंच चित्राताई वराळ यांचे मत

**निघोज : प्रतिनिधी**

**महिलांमध्ये कर्करोगाचे प्रमाण जास्त असून यासाठी नियमीत तपासणीची गरज असल्याचे प्रतिपादन सरपंच चित्राताई वराळ पाटील यांनी व्यक्त केले आहे.**

निघोज येथील मुलिकादेवी महाविद्यालयात शिरूर येथील सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने महिलांच्या कर्करोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी त्या बोलत होत्या. या शिबीरात शंभर पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनींची तपासणी करण्यात आली. या




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सहदेव आहेर होते.यावेळी सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्रा. व कार्यक्रम अधिकारी परभाणे मॅडम तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सरपंच वराळ यावेळी म्हणाल्या सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने हे शिबीर आयोजित केले आहे यासाठी लायन्स क्लब ऑफ पुणे यांनी सहकार्य केले आहे. हा उपक्रम समाजसवी आहे यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अमोल शहा, डॉक्टर बोहाती यांच्या नेतृत्वाखाली उपक्रम राबवीत कार्यक्रम अधिकारी प्रा परभाने मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने चांगला उपक्रम राबविला आहे. अशाच उपक्रमांची आज खऱ्या अर्थाने गरज आहे.

मुलिकादेवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सहदेव आहेर यावेळी म्हणाले आजच्या काळात प्रत्येक आजारावर निदान काढण्यासाठी योग्य यंत्रणा उपलब्ध आहे मात्र यासाठी आरोग्य शिबीराच्या माध्यमातून तपासणी होण्याची गरज आहे. आज कर्करोग तपासणी करायची म्हटले तर खर्च बराच येतो मात्र या हिवाळी शिबीराच्या माध्यमातून शिरूर येथील सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाच्या माध्यमातून कोणतीही फी न आकारता हा उपक्रम सेवाभावी म्हणून घेतला आहे. ही बाब कौतुकास्पद आहे असेच उपक्रम सातत्याने राबविल्यास याचा फायदा सर्वसामान्य जनतेला मोठ्या प्रमाणात मिळेल असे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.यावेळी कार्यक्रम अधिकारी परभाणे मॅडम यांनी प्रास्ताविकात शिबीराची माहिती दिली.

# रक्तदान शिबिरांच्या आयोजनाची गरज

## उद्योजक सुरेश पठारे यांचे मत | कन्हैय्या ॲग्रोत रक्तदान शिबिर



**गटेवाडी : प्रतिनिधी**

**रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत रक्ताची आवश्यकता कशी भासत असते,हे आपल्या सर्वांनी अनुभवलेले आहे.रक्ताचा तुटवडा कमी होण्यासाठी औद्योगिक वसाहतीत विविध कंपनी व्यवस्थापनाने रक्तदान शिबिरांचे आयोजन करावे अशी अपेक्षा कन्हैय्या ॲग्रोचे कार्यकारी संचालक सुरेश पठारे यांनी व्यक्त केली.**

पारनेर तालुक्यातील गटेवाडी येथील कन्हैय्या ॲग्रो कंपनीत दरवर्षीप्रमाणे एच.डी.एफ.सी बँक, जनकल्याण रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिर प्रारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी नगराध्यक्ष नितीन अडसूळ,संचालक लिबेश नायर व कंपनी मधील सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री.पठारे म्हणाले,रक्तदानानंतर शरीरातील रक्ताचे प्रमाण ४८ तासांत पूर्ववत होते आणि यामुळे अशक्तपणा येतो हा गैरसमजही दूर झाला आहे.रक्तदानामुळे शरीरात नवचैतन्य निर्माण होते.आपण ९० दिवसांच्या अंतराने नियमित रक्तदान करू शकतो.रक्तदानामुळे इतरांच्या प्राण वाचवण्याचे समाधान मिळते जे अनमोल आहे.

### गरजूंना मदतीचा हात

कन्हैय्या ॲग्रो नेहमीच सामाजिक उपक्रमांसाठी पुढाकार घेते.रक्तदान शिबिर त्याच उपक्रमांपैकी एक आहे.रक्तदान हे समाजसेवेतील एक महान कार्य आहे, आणि यामुळे अनेक गरजूंना मदतीचा हात देण्याचा संकल्प आम्ही सिद्धीस नेला.

नितीन अडसूळ, नगराध्यक्ष

# व्हिजीच्या आगीला व्यवस्थापन जबाबदार; मनसेचा आरोप

## बेकायदेशीर कंपन्यांवर कारवाई करण्याची मागणी

**सुपा : प्रतिनिधी**

**सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीमधील व्हिजी कार्बन कंपनीस लागलेल्या आगीस कंपनी व्यवस्थापनच जबाबदार असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तालुका उपाध्यक्ष रविश रासकर यांनी केला आहे.**

यासंदर्भात रासकर यांनी प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, आग प्रतिबंधात्मक कोणतीही यंत्रणा नसल्याने गुरूवारी सकाळी या कंपनीमध्ये शॉर्ट सर्कीट होऊन आग लागली. क्षणार्धात आगीने रौद्र रूप धारण करून इतर कंपन्यांनाही त्याचा धोका निर्माण होण्याची चिन्हे होती, मात्र शिरूर येथील अग्निशमन यंत्रणा वेळेत पोहचल्याने आगीवर नियंत्रण मिळविणे शक्य झाल्याचे रासकर यांचे म्हणणे आहे.



शिरूर येथील अग्निशमन यंत्रणा आली मात्र रौद्र रूप धारण केलेली आग आटोक्यात आणण्यासाठी ती पुरेसी नव्हती. नगर येथून आणखी यंत्रणा पाचारण करण्यात आल्यानंतर आग आटोक्यात आली. या कंपनीशेजारी तुफान ही केमिकल कंपनी आहे. दुर्देवाने या आगीची झळ या कंपनीस पोहचली असती तर मोठया दुर्घटनेस सामोरे जावे लागले असते. त्यातून जीवित हाणी झज्ञली असती तर त्यास जबाबदार कोण असा प्रश्नही रासकर यांनी उपस्थित केला आहे.

पुन्हा अशा प्रकारच्या दुर्घटना घडू नयेत यासाठी रासकर यांनी पारनेरच्या तहसिलदार गायत्री सैंदाणे, औद्योगिक वसाहत कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे निवेदन सादर करून कारवाईची मागणी केली आहे.

### ऑडीट करून कारवाई करा

या घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी औद्योगिक वसाहतीमधील रबर तसेच टायरच्या ज्या कंपन्या आहेत, त्यांचे फायर ऑडीट करून बेकायदेशिर कंपन्यांवर कारवाई करून त्या सील करण्यात याव्यात. कामगारांची सुरक्षा नसलेल्या कंपन्यांचे परवाने रद्द करावेत. तसे न झाल्यास औद्योगिक वसाहत कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा रविश रासकर, संदीप चव्हाण यांनी दिला आहे.

# नवोदयच्या विद्यार्थ्यांनी साधला संपादकांशी संवाद!

## विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीसाठी अनोखा उपक्रम




**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**येथील नवोदय विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. त्यापैकीच एक संपादकांशी संवाद या विषयांतर्गत पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात बीबीसी मराठीचे संपादक अभिजीत कांबळे यांची मुलाखत आयोजित करण्यात आली होती.**

श्री.कांबळे यांना पत्रकारितेच्या क्षेत्रात दोन दशकांचा प्रदीर्घ अनुभव असून केसरी, लोकमत, महाराष्ट्र टाइम्स, झी २४तास, ई टीव्ही अशा अनेक माध्यमांतून पत्रकारितेत काम केलेले कांबळे हे नवोदय विद्यालयाच्या दुसऱ्या बॅचचे माजी विद्यार्थी आहेत. विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांनी मुलाखतीत विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना श्री कांबळे सरांनी सांगितले की नवोदय विद्यालयात शिकलेला प्रत्येक विद्यार्थी कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात यशस्वी होत आहेत. मी सुद्धा पत्रकारिता या क्षेत्रात यशस्वी संपादक होण्यामागे विद्यालयाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

आपल्या चौफेर वाचनामुळे भाषेवर प्रभुत्व मिळवता येते. संभाषण कौशल्य विकसित होते, लेखन कौशल्य सुधारते.नवोदय विद्यालयात होत असलेल्या विविध उपक्रमांमुळे आत्मविश्वास वृद्धिंगत होतो.

विविध प्रकारच्या माध्यमांमध्ये किंवा पत्रकारितेत खूप ताकद असते त्याचा आपण समाजासाठी विधायक उपयोग करायला हवा. देशाचे नागरिक म्हणून आपण स्वायत्त संस्था, विधायिका, न्यायपालिका या सर्वांची कार्य काय हे आपण समजून घेतले पाहिजे. समाज हिताचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विद्यार्थ्यांना प्रश्न पडायला हवेत आणि ते आदरपूर्वक शिक्षकांना विचारायला हवेत.

बीबीसीच्या कामाचं स्वरूप सांगताना ते म्हणाले की फोटो, व्हिडिओ, शब्दांकन, बातमीची प्रामाणिकता तपासूनच निवड करून बातम्या प्रसारित केल्या जातात. लोकांच्या जगण्याशी संबंधित विषय लोकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, यासाठी बातम्या मनोरंजक कशा करता येतील यासाठी बीबीसी प्रयत्नरत आहे. पत्रकारिता या क्षेत्रात अनेक आव्हानात्मक प्रसंगांनाही सामोरे जावे लागते.

कार्यक्रमांतर्गत प्रमुख अतिथी श्री.अभिजीत कांबळे सर व सौ. अर्चना कांबळे मॅडम,श्री.कपिल ठोकळ सर,श्री.अनिल मोरे या सर्वांचे स्वागत विद्यालयाचे प्राचार्य बोरसे सर व उपप्राचार्य मुन्नरवार यांनी केले.संपादकांची मुलाखत विद्यालयाचे मराठी विषयशिक्षक राजाराम फंड, ग्रंथालयाचे ग्रंथपाल मदन तुपकर,भोंडवे सर,या शिक्षकांनी तसेच वैभवी बोढके, निर्झरा वाघमोडे, अविष्कार हांडे,सर्वज्ञ वनपुरे,श्रेयस पंचमुख, श्रुतिका झगडे,संचेती जगताप या विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून संवाद साधत मुलाखत घेण्यात आली.

# राहुल रसाळांची क्रांती युवांसाठी माईल स्टोन!

## अल्पवयात राज्यपालांचा उद्यान पंडीत पुरस्कार | तंत्रज्ञानाचा वापर करून घडविली कृषि क्रांती

**निघोज : विशेष प्रतिनिधी श्रीकांत चौरे**

**बीएससी ॲग्रीची पदवी घेऊन शेतीमध्ये नवनवे प्रयोग करून कृषि क्षेत्रात क्रांती करणारे निघोजचे युवा शेतकरी राहुल रसाळ यांचे कार्य युवा शेतकऱ्यांसाठी माईल स्टोन ठरत आहेत. युवा शेतकऱ्यांचे ते आयकॉन आहेत. अल्प वयात त्यांनी राज्यपालांच्या उद्यान पंडीत या पुरस्कारास गवसणी घालून कृषि क्षेत्रातील आपले योगदान त्यांनी अधोरेखित केले आहे. त्यांनी कृषि क्षेत्रात केलेले प्रयोग अभ्यासण्यासाठी राज्यभरातील विशेषतः युवा शेतकरी निघोजला हजेरी लावत आहेत.**

माध्यमिक शिक्षण घेत असतानाच राहुल हे घरच्या शेतीमध्ये रमत. शेतीकडे लक्ष देतानाच त्यांनी कृषि पदवीचे शिक्षण पुर्ण केले आणि त्यांच्या कृषि क्षेत्रातील वेगवेगळया प्रयोगांना सुरूवात झाली. अर्थात कृषि क्षेत्रात वजनदार व्यक्ति म्हणून ओळख असलेले त्यांचे वडील अमृताशेठ रसाळ यांचे त्यांना मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

शेतीची सुत्रे हाती घेतल्यानंतर राहुल यांनी अडीच एकर क्षेत्रात थॉमसन सीडलेस या हिरव्या रंगाच्या द्राक्षांची लागवड केली. या उत्पादनास बाजारपेठेत मागणी कमी होत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी बाजारपेठेचा कानोसा घेतला असता परदेशात लाल रंगाच्या द्राक्षांना चांगली मागणी असल्याची माहीती त्यांना मिळाली. त्यांनी धाडस करून सन २००६ मध्ये क्रिमसन या लाल रंगाच्या द्राक्षाची लागवड केली.



### काय दिलाय राहुल यांनी सल्ला ?

शेतीमधील या यशाचे मुख्य कारण मातीचे व्यवस्थापन हे आहे. रेसिडयू फी फार्मिंग व एक्सपोर्टसाठी असलेले ग्लोबल गॅप सर्टिफिकेशन तसेच अ पेड ग्रेपनेटचे रजिस्ट्रेशन करण्यात आले आहे. रासायनिक खतांचा वापर न करता जैविक खे, शेतातील कचऱ्या पासून तयार करण्यात आलेली खते यांचा वापर करण्यात येतो. रासायनिक खतांच्या अतिरेकी वापरामुळे शेती नापिक होते. जैविक, सेंद्रीय खतांचा वापर करून विषमुक्त, पिकयुक्त शेती होते. पिकांना अन्न म्हणून खतांइतकेच शुध्द पाणी म्हणून क्षारमुक्त पाण्याची गरज असते. क्षारयुक्त पाण्यामुळे शेती नापीक होते. त्यासाठी शेतीच्या पाण्यासाठी आर ओ प्लान्ट उभारण्यात आला आहे.

राहुल रसाळ, युवा प्रगतीशिल शेतकरी

त्यांचा हे धाडस फळास आले. तब्बल सहा वर्षे या द्राक्षांना परदेशातून मागणी वाढली, भावही चांगला मिळाला. शेतामध्ये केलेल्या प्रयोगामुळे प्रती एकर १० टन उत्पादन होउन प्रतीकिलो १२० ते १४० रूपये प्रतिकिलोने त्याची विक्री होऊन प्रती एकरी १२ ते १६ लाखांचे उत्पन्न त्यांना मिळाले. सध्या १४ एकरवर त्यांची द्राक्षांची बाग आहे.

### आंतरपिकांतून घरखर्च !

द्राक्षवेलींच्या रांगेमध्ये कारले, पडवळ तसेच इतर भाजीपाल्यांची पिकेही आंतरभुत पध्दतीने घेतले जाते. त्यातून घरचा भाजीपाला, पाहुण्या रावळयांना वानवळा याबरोबरच संपूर्ण घरखर्च त्यातून भागविला जातो. त्यांनी २५ एकर क्षेत्रात डाळींब बाग फुलविला असून त्यास २०० रूपये किलोचा भाव मिळतो. ४ एकर क्षेत्रात पेरूची बाग असून त्यालाही १०० रूपये किलोचा भाव मिळतो आहे.

### माती परीक्षण काळाची गरज

आधुनिक पध्दतीने विषमुक्त व जास्त उत्पन्न देणारी शेती करण्यासाठी सुरूवातीस मातीचे परिक्षण करू घ्या. ही काळाची गरज आहे. कमी कष्टात, कमी भांडवलात जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी वैविध्यपूर्ण, अधुनिक तंत्रज्ञान वापरणे हे फायदेशीर ठरते असा कानमंत्र राहुल रसाळ यांनी दिला.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com